02-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 01-06-2025 22:32 Page 1



# हरमल भटवाडीत मुख्य रस्त्याला भगदाड

## रस्त्याला तळ्याचे रूप : खंदकाची भीती, वाहनचालक, नागरिक संतप्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** येथील पंचायत क्षेत्रातील प्रभाग नऊ मधील भटवाडी भागात रस्त्याला भले मोठे भगदाड पडले असून पाणी आत झिरपत असल्याने, त्याठिकाणी भला खंदक पडण्याची भीती तसेच नजीकच्या घरांना धोका उत्पन्न होण्याची भीती व्यक्त होत आहे.ह्या परिस्थितीमुळे वाहनचालक व नागरिक संतप्त झाले आहेत.

गेल्या आठ दिवसातील सलग पावसामुळे पांडुरंग पार्सेकर याच्या घरासमोर रस्त्याच्या मधोमध खड्डा पडला असून पावसाचे पाणी आत खड्ड्यात जात आहे.त्या खड्ड्यामुळे अनुचित प्रकार घडण्याच्या शक्यतेमुळे युवकांनी तांबडे निशाण उभे केलेय तसेच वृक्षारोपण केले आहे.सदर खड्डा किमान मीटर भर खोल तसेच तीन चार मीटर रुंद असल्याचे समजते.अवजड वाहनाच्या वजनाने रस्ता खचून मोठी भेग व तडा पडण्याची भीती असून मोठी दुर्घटना घडण्याची भीती भटवाडी भागातील युवकांनी व्यक्त केली.

रस्त्यानजिकच्या घरात पाणी भरले

भटवाडी भागातील रस्ता जलवाहिनी व भूमिगत केबल्स मुळे खोदला होता व सध्या तळ्याचे स्वरूप आले आहे.सदरचे चर बुजविताना हलगर्जीपणा झाला व नजीकच्या घरात पावसाचे पाणी घुसल्याने बरीच तारांबळ उडाली. त्या रस्त्यात फुटभर खड्डे पडले तसेच पाणी साचून असल्याने, वाहने हाकताना बरीच कसरत करावी लागते.





काहींनी घरात पाणी घुसेल,ह्या भीतीने रस्त्यातील पाणी अडवण्याचे काम केले मात्र धुवांधार पावसामुळे अशक्य बनल्याचे युवकांनी सांगितले.

सदरचे काम पूर्णपणे निकृष्ट दर्जाचे केले असून वाहने डाव्या बाजूनी घेतल्यास वाहने मीटर भर खोल रुतण्याची शक्यता नाकारता येत नाही,असे सोमा नाईक यांनी सांगितले.पाऊस ठेपल्याचे दिसताच, कंत्राटदाराने सोलिंग कच्चे केले व केवळ डांबर घालून रस्ता ठाकठिक केला.त्या रस्त्याची स्थिती पाहता,कामाचा दर्जा कळून येतो.भटवाडी ते गिरणीपर्यंतचा रस्ता पूर्णपणे खचला असल्याचे नाईक यांनी सांगितले.

दरम्यान, या तळ्याच्या विरुद्ध बाजूने दिल्ली नोंदणीकृत कार पार्क केली असून वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.परिणामी मोठी दुर्घटना घडण्याची चिन्हे असल्याचे एका युवकाने बोलून दाखवले. तरी बांधकाम खात्याने ह्या रस्त्याच्या बाबतीत रस्त्यावरील पाणी वाहून जाण्यासाठी तसेच भलामोठा खड्डा बुजवण्याची उपाययोजना करण्याची मागणी नागरिक तसेच वाहन चालकातून होत आहे.

# आमोणे, काणकोण येथे पुण्याच्या आचार्य अकादमीच्या प्रशिक्षण वर्गाला प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

आगोंद, दि. १ : ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना दर्जात्मक व स्पर्धात्मक शिक्षण मिळावे यासाठी आमोणे, पैंगीण येथील श्री बलराम शिक्षण संस्थेने महत्वाचे पाऊल उचलले आहे. पुणे येथील आचार्य अकादमीच्या सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून याठिकाणी कायमस्वरूपी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला.

पहिल्या वर्षी १० वी उत्तीर्ण होऊन अकरावीत प्रवेश करीत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पुढील वर्षापासून काणकोण तालुक्यातील ८ वी, ते १० वी. इयत्तेतील विद्यार्थ्यांना खास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यंदाच्या या प्रशिक्षण वर्गाचा लाभ घेण्यासाठी गोव्याच्या विविध भागातील विद्यार्थी आपल्या पाल्ल्यासह खास उपस्थित होते.

यावेळी आचार्य अकादमीचे प्रमुख ज्ञानेश्वर मुटखुळे यांनी पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतानाच आचार्य अकादमी करीत असलेल्या कार्याची माहिती करून दिली.



**आमोणे काणकोण : पुणेच्या आचार्य अकादमीच्या प्रशिक्षण वर्गात सभापती रमेश तवडकर सविता तवडकर, ज्ञानेश्वर मुटखुळे, सुधीर सिंगारे, डॉ.सावसे, दीपक पांडे, प्रियांका, अविनाश व इतर.**

यावेळी श्री बलराम शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सभापती डॉ. रमेश तवडकर, श्री बलराम निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सविता तवडकर, आचार्य अकादमीचे प्रमुख ज्ञानेश्वर मुटखुळे, सुधीर सिंगारे, डॉ. सावसे, दीपक पांडे, प्रियांका, श्री. अविनाश हे पदाधिकारी उपस्थित होते.

# कालिदास के. सातार्डेकर यांनी आंतरराष्ट्रीय जलरंग महोत्सवाचे केले प्रतिनिधित्व

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १ :** गोमंतकीय प्रतिभाशाली चित्रकार कालिदास के. सातार्डेकर, (आंतरराष्ट्रीय जलरंग संघटना दक्षिण भारताचे प्रमुख) यांनी अलिकडेच तुर्कीतील आकचाकोवा येथे आयोजित प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय जलरंग महोत्सवात अत्यंत भारताचे प्रतिनिधित्व केले. कलेद्वारे प्रेम, समजूतदारपणा आणि शांतता या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव, जगभरातील कलाकारांना एका व्यासपीठावर आणत कलेच्या सार्वत्रिक भाषेतून सांस्कृतिक संवाद घडवून आणणारा अनुभव ठरला असे कालिदास सातार्डेकर यांनी पत्रकारांना सांगितले. सातार्डेकर यांनाअतिथी कलाकार आणि डेमोन्स्ट्रेशन आर्टिस्ट (प्रात्यक्षिक कलाकार) म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी त्यांच्या जलरंग चित्रकलेतील कौशल्याचे प्रात्यक्षिक सादर केले. त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शनही यावेळी झाले आणि उपस्थित प्रेक्षक व आंतरराष्ट्रीय



कलाकारांकडून त्यांना भरभरून दाद मिळाली.हे आमंत्रण आंतरराष्ट्रीय जलरंग संघटनेचे संस्थापक व अध्यक्ष अतानूर डोगन आणि खथड इझमीरचे प्रमुख यासार बिरिंची यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. या महोत्सवात जपान, स्पेन, जर्मनी, इराण, रशिया, युक्रेन, चीन, अझरबैजान तसेच इतर अनेक देशांतील खथड नेते आणि कलाकार सहभागी झाले होते, यावरून या कार्यक्रमाचा जागतिक स्वरूप व सहकार्याची भावना अधोरेखित होते. सातार्डेकर यांनी आपल्या अनुभवाबद्दल सांगताना म्हणाले. जगभरातील प्रतिभावान कलाकारांशी संवाद साधण्याची संधी मिळणे हे खरोखरच प्रेरणादायी होते.

# गोव्यातून सांगलीकडे होणारी ४७ गुरांची वाहतूक बांदा पोलिसांनी रोखली

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा दि. १ :** होंडा (गोवा) येथून सांगली च्या दिशेने केल्या जाणाऱ्या गुरांच्या बेकायदा वाहतुकी विरोधात बांदा पोलिसांनी कारवाई केली. यात तीन आयशर टेम्पो व पिकअप टेम्पोत तब्बल ४७ गुरे अक्षरशः कोंबण्यात आली होती. या कारवाईत गुरांसह तीन आयशर टेम्पो व एक पिकअप टेम्पो असा एकूण तब्बल ५१ लाख रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कायद्यानुसार याप्रकरणी ११ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ही कारवाई शुक्रवारी रात्री ११.३५ वाजण्याच्या सुमारास इन्सुली पोलिस चेकपोस्टवर करण्यात आली.

बांदा पोलिस स्टेशनमध्ये रात्री मोठ्या संख्येने गोरक्षक दाखल झाले होते. गुरांची गवत, पाण्याची सोय न करता त्यांना दाटीवाटीने टेम्पोत कोंबण्यात आले होते. यावेळी बांदा पोलीस निरीक्षक विकास बडवे, दोडामार्ग पोलीस निरीक्षक हेमचंद्र खोपडे, वेंगुर्ले पोलीस निरीक्षक निसर्ग ओतारी यांच्यासह मोठा पोलीस फौजफाटा तैनात होता. गुरांची अमानुषपणे वाहतूक करणाऱ्या सर्व संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

त्यानुसार रात्री उशिरा सुनील ज्ञानेश्वर पाटील (बेळगाव), अमोद फुशन शर्मा (बिहार), किरण भांगरे (फोंडा गोवा), बाबू इलाही जामदार (शिरोळ कोल्हापूर), सतीश बाबुराव पुजारी (शिरोळ कोल्हापूर), नामदेव पंढरीनाथ पाटील (कवठेमहाकाळ सांगली), सुलोचना महेश गिरोडकर (गोवा), पोपट जयवंतराव पाटील (कवठेमहाकाळ सांगली), प्रदीप हैबती सव्वासे (कोल्हापूर), सुरत शौकत लकडे (कोल्हापूर) आणि श्याम रामराव कुलकर्णी (सांगली) या अकरा जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

शनिवारी सकाळी सर्व ४७ गुरांना मूळ होंडा गोवा येथे सोडण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक विकास बडवे यांनी दिली. अधिक तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नाईक करीत आहेत.

# ग्रामीण भागात सार्वजनिक बससेवा नियमित करणार

## माझी बस योजनेअंतर्गत शेवटच्या घटकापर्यंत गोव्यात प्रवासाची होणार सुविधा | मुख्यमंत्र्यांची घोषणा

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १ :** राज्यातील संपूर्ण ग्रामीण भागातील लोकांना शहरापर्यंत सकाळ ते रात्री या दरम्यान सार्वजनिक बस वाहतूक सेवा सुरू करण्याचा सरकारचा निर्धार आहे. त्याची चाचपणी सुरू करण्यात आलेली आहे. माझी बस अंतर्गत किलोमीटर मागे तीन रुपये व गरज पडल्यास त्याहून अधिकही अनुदान देऊन ही बससेवा सुरू करण्यात येणार असून त्यामुळे सकाळी दुपारी व रात्रीच्या वेळी विशेष करून विद्यार्थी महिलावर्ग शिक्षण घेतात त्या विद्यार्थ्यांना व खाजगी नोकरी करतात त्यांच्यासाठी ही ग्रामीण वाहतूक सेवा वरदान ठरणार असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सुर्ला येथे घोषित केले.

पद्मिनी फाउंडेशनच्या वतीने प्राथमिक तत्त्वावर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सुर्ला भागात सुमारे दोन ते तीन किलोमीटर लोकांना चालून जावे लागते त्यासाठी प्रारंभी बस सुरू करून या योजनेला चालना दिली आहे. ३६५ दिवस संपूर्ण दिवस ही वाहतूक व्यवस्था असून त्याचा लाभ सर्वांनी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

अशाच प्रकारे संपूर्ण राज्यात शेवटच्या घटकापर्यंत व गावातील शेवटच्या घरापर्यंत वाहतूक सेवा उपलब्ध करणे हा आपला संकल्प असून त्यानंतर वाहतूक मंत्री माविन गुदिन्हो यांना या संदर्भात विशेष रचना करण्यात सांगितले आहे.

गावातील सर्व भागात विद्यार्थी विद्यार्थिनी महिला वर्गांना कोणत्याही प्रकारची धास्ती असू नये विशेष करून ग्रामीण भागात बस सेवा उपलब्ध असते, त्यावेळी महिलांची सुरक्षितता व इतर बाबींचा विचार करून ही योजना आम्ही सुरू करणार आहोत, त्याला सर्वांनी सहकार्य करावे. माझीच बस सेवा असे मानून सर्वांनी सहकार्य केल्यास निश्चितपणे त्याला चालना मिळेल आणि ही व्यवस्था वर्षभर ३६५ दिवस चालू राहील असेही त्यांनी सांगितले.

**CHANGE IN NAME**

I **ROSIE RODRIGUES** R/o, Hno - 110/A, Tambetim Maina Curtorim Salcete Goa, would like to change my name from **ROSE RODRIGUES** to **ROSIE RODRIGUES**. Hereafter in all documents and dealing will be known by the name **ROSIE RODRIGUES.**



उपलब्ध माहितीनुसार सध्या जी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे, ती योग्य पद्धतीने हाताळली जात नाही त्यामुळे प्रवाशांना फटका बसतो विद्यार्थी, विद्यार्थिनी खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या महिला व इतरांना काळोखातून जावे लागते त्यामुळे ज्या ठिकाणी असुरक्षितता आहे, त्या सर्व ठिकाणी सोलार वीज व्यवस्था करण्याची सूचना दिलेली आहे. ग्रामीण भागातून शहरापर्यंत नियमित सार्वजनिक बसव्यवस्था करण्याचा निर्धार सरकारने घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

ही सार्वजनिक व्यवस्था संपूर्ण गोव्याच्या कानाकोपऱ्यात टप्प्याटप्प्याने सुरू करण्यात येईल. बस चालकांनी प्रवासी मिळवण्याच्या नादात ओवरटेक करणे कट मारणे व त्यामुळे होणारे अपघात टाळणे याबाबत कटाक्षाने लक्ष पुरवावे.

तसेच ग्रामीण भागातून शहराकडे येताना सार्वजनिक बस सेवेचा उपयोग करताना चार चाकी व दुचाकी वाहनांची फेरी कमी करावी, जेणेकरून प्रदूषणही रोखणे शक्य होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

साखळी मतदारसंघात सर्वच ग्रामीण भागात अशा प्रकारची व्यवस्था पद्मिनी फाउंडेशनतर्फे करण्यात येणार असून त्याचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थी महिलावर्ग तसेच कामाला जाणाऱ्या लोकांनी व प्रवाशांनी घ्यावा, असे आवाहनही यावेळी मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

## पान १ वरून

पान १ वरून

### अॅग्रीगेटर अॅप विरोधात स्थानिक टॅक्सी चालकांचा एल्गार !

दरम्यान, म्हापसा-साळगावमधील चालक प्रतिनियमनाला विरोध दर्शविणारे निवेदन आमदार केदार नाईक यांच्याकडे दाखल केले. २० मे रोजी जाहीर झालेल्या अधिसूचनेत सरकारने कॅब अॅग्रिगेटर्स नियमावली'साठी मार्गदर्शक तत्त्वांवर जनसूचना मागवली असून ती टॅक्सी व्यावसायिकांच्या हिताविरोधात असल्याचा आरोप करण्यात आला.आमदार नाईक यांनी, टॅक्सी व्यावसायिकांचे म्हणणे योग्य मंचावर मांडू; लवकरच किनारी भागातील इतर आमदारांबरोबर बैठक घेऊ, असे आश्वासन दिले.

सरकारच्या नव्या कॅब अॅग्रीगेटर धोरणाला अनेक भागातल्या टॅक्सी चालकांनी विरोध करणे सुरू केले असून आपले आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिलाय . याचाच भाग म्हणून राज्यभरातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांत टॅक्सी चालकांचे निषेध अर्ज जमा केले जाणार आहेत.

तसेच विरोधी आमदारांसह अनेक स्थानिक लोकप्रतिनिधींवर मुद्दा विधानसभेत मांडण्यासाठी दबाव वाढवला जाणार आहे . इतकेही करून सरकारने अॅग्रीगेटर धोरण पूढे रेटल्यास .मोर्चे-रस्ता रोकोसह तीव्र आंदोलनाचा इशारा टॅक्सी चालकांनी दिला आहे . सरकारने आगामी अधिवेशनापूर्वी अॅप-अधिसूचना मागे घेतली नाही, तर किनारपट्टीपासून राजधानीपर्यंत टॅक्सी व्यावसायिकांचे आंदोलन उफाळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

---

### ईशान्येत भीषण जलप्रलय : 30 जणांचा मृत्यू

सिक्कीममधल्या उंच डोंगराळ भागात सततचा पाऊस आणि भूस्खलन सुरूच आहे. लाचेन आणि लाचुंगमध्ये १,४५० हून अधिक पर्यटक अडकले असून, रस्त्यांचे संपर्क तुटले आहेत.तीस्ता नदीच्या पाण्याची पातळी धोक्याच्या पातळीवर पोहोचली आहे. मंगन-चुंगथांग बेली ब्रिज अंशतः वाहून गेला आहे. शनिवारी तीन तासांसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. उत्तर सिक्कीममध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे.पर्यटकांनी भरलेली कार मुनसिथांग भागात नदीत कोसळल्याने नऊ जण बेपत्ता झाले आहेत.लाचेनमध्ये ११५, लाचुंगमध्ये १,३५० पर्यटक अडकले आहेत.

इम्फाळ शहरात खुराई, हिंगांग आणि चेकोन भागांतील नदीचे बंधारे फुटल्याने राजधानीचे अनेक भाग जलमय झाले आहेत. लष्कर आणि आसाम रायफल्सचे जवान ८०० हून अधिक लोकांना मदत छावण्यांमध्ये हलवत आहेत.४,००० पेक्षा अधिक नागरिक प्रभावित झाले असून ८८० घरे पूर्णतः नष्ट झाली आहेत.

---

### गोवा चेंबर ऑफ कॉमर्सने जीएसटी प्रणालीत सुचवल्या सुधारणा

धेंपे यांनी सांगितले की, उलट शुल्क रचनेमुळे उद्योजकांची वित्तीय चक्रे विस्कळीत होतात आणि कामकाजावर परिणाम होतो. त्यांनी विश्वास व्यक्त केला की मुख्यमंत्री सावंत येत्या जीएसटी परिषदेत गोव्यातील व्यावसायिक समुदायाच्या मागण्या प्रभावीपणे मांडतील. तसेच, या सुधारणांच्या अंमलबजावणीसाठी चेंबर शासनासोबत सहकार्य करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. जीसीसीआयच्या या सविस्तर निवेदनामुळे गोव्यातील उद्योगांना अधिक अनुकूल कर प्रणाली मिळविण्याच्या दिशेने पुढील वाटचाल होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# फादर अविनाश माशकारेंजस यांचा सन्मान



**पेडणे : फादर अविनाश माष्करेन्जेस यांच्या सत्कार सोहळ्यानंतर मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर, माजी सरपंच रुपेश परब इतर.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १ :** पेडणे चर्चचे फादर अविनाश मास्कारेजस यांच्या कार्याची दखल घेत व सर्व धर्म समभाव मानणाऱ्या फादर अविनाश मास्कारांचजेस यांचा राजन कोरगावकर यांच्याहस्ते शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी मिशन फॉर लोकल पेडणे कार्यालयात आयोजित केलेल्या सत्कार समारंभाला व्यासपीठावर पेडणे ज्येष्ठ नागरिक मधुकर पालयेकर, मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर, मोपाचे माजी सरपंच रुपेश परब, फादर अविनाश माषकारेजस, गुंडू राऊळ, गजानन गडेकर, माजी उपनगराध्यक्ष गजानन सावळ देसाई, तुळशीदास कवठणकर, माजी पोलीस अधिकारी श्री. शिंदे आदी उपस्थित होते.

राजन कोरगावकर यांनी सांगितले, पेडणेचे फादर अविनाश यांनी ख्रिस्ती बांधवांना संघटित करण्याबरोबरच इतर धर्मातील इतर समाजातील नागरिकांमध्ये एकोपा संघटित पणा कसा निर्माण होईल याविषयी त्यांनी कार्य केले. त्या कार्याची दखल घेऊन आज त्यांचा या ठिकाणी आम्ही सत्कार करत असल्याचे मिशन फार लोकलचे राजन कोरगावकर यांनी सांगितले. त्यांनी पुढे सांगितले मिशन फॉर लोकलचे हे कार्यालय पेडणेवासीयांसाठी पूर्णपणे खुले आहे. या कार्यालयामार्फत ज्या सरकारच्या वेगवेगळ्या योजना आहेत .जे उपक्रम आहेत. ते उपक्रम सरकार मार्फत लोकापर्यंत पोहोचवण्याचं कार्य या कार्यालयातून केले जाते. काही सरकारी अर्ज काही सरकारचे फॉर्म योजनांचे अर्ज या कार्यालयात भरून दिले जातात. त्यासाठी प्रत्येक गरजवंताने या कार्याचा लाभ घ्यावा. आणि फादर अविनाश माशकारेंजेस यांनीही त्या त्या परिसरात जनजागृती करावी असे आवाहन यावेळी राजन कोरगावकर यांनी केले.

अनेक लाभार्थ्यांना लाभ मिशन फॉर लोकल तर्फे अनेक उपक्रम मागच्या चार वर्षापासून पेडणे मतदार संघात सुरू आहे. पायलट मोटरसायकल इतर जे व्यावसायिक आहेत, त्यांना आयुर्विमा इतर सोयी सुविधा सरकारी योजनांचा लाभ शिवाय खाजगी कंपन्यांमध्ये युवकांना नोकऱ्याही देण्याचे राजन कोरगावकर यांनी केले. त्याबद्दल मोपा माज सरपंच रुपेश परब यांनी मिशन फॉर लोकल पेडणे मतदारसंघासाठी काय काय उपक्रम राबवतात याविषयी सविस्तर माहिती दिली. स्वरूपा लोगो यांनी सत्कार मूर्तीचा परिचय आणि प्रास्ताविक केले तर मोपाचे माजी सरपंच रुपेश परब यांनी सूत्रसंचालन केले. फादर अविनाश मास्करेंजेस यांनी सत्कार घडवून आणला त्याबद्दल आपण त्यांचे आभार मानतो.